# <u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>

## प्रेस नोट दि.२९/०९/२०१८

## <u>दि.२८/०९/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १८१/१८,भादविक ३०२,३४ |
| **फिर्यादी** | सुयश बी.जोशी,सहा.पो.निरी. डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०३/२०१८ रोजी रात्रौ ०१/०० ते सकाळी ०६/०० वा.चे सुमारास १०१/३५, उदयहौसिंग सोसायटी, चंद्रागन साहेबराव बिल्डींग, एरंडवणा,पुणे |
| **तपशिल** | डेक्कन पोलीस स्टेशन अ.म.रजि.नं. ०८/२०१८ सीआरपीसी १७४ मधील मयत इसम नामे सौरभ सतिश गोन्डाने, वय २८ वर्षे,रा.सध्या -१०१/३५,उदयहौसिंग सोसायटी, चंद्रागन साहेबराव बिल्डींग, एरंडवणा पुणे व मुळ पत्ता- श्रध्दानगर, छिंदवाडा, राज्य मध्यप्रदेश याचे अकस्मात मृत्युबाबत झालेली चौकशी व तपासावरून त्याचप्रमाणे ससुन हॉस्पीटल पुणे येथील वैदयकीय आधिकारी यांनी मयताच्या मृत्यचे कारणाबाबत वेळोवेळी दिलेले वेगवेगळे अभिप्राय यावरुन मयत इसम नामे सौरभ गोन्डाने यांचा मृत्यु हा संशयास्पद स्थितीत झाला असलेचे निष्पन्न होत असलेने सदर मयत इसम दिनांक ०३/०३/२०१८ रोजी रात्रौ ०१/०० ते सकाळी ०६/०० वा. चे दरम्यान पुणे येथील त्याचे सध्याचे राहते रुमचे संडास बाथरुममध्ये कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन कोणत्यातरी कठीण वस्तुने डोक्याचे मागील बाजुस प्रहार करुन खुन केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.एन.गवते ९८८१६०२१०० सिंहगड रोड पो.स्टे. |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ४५६/१८,भादविक ३०७,५०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ३८ वर्षे,रा.धायरी,पुणे |
| **आरोपी** | संतोष नामदेव चव्हाण,वय ३९ वर्षे,(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०९/१८ रोजी १४/४५ वा.चे सुमारास जिल्हा परीषद प्राथमिक शाळा,न-हे,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे पती-पत्नी असुन, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हया त्यांचे सहकारी यांचे बरोबर नमुद शाळेच्या वर्गात जेवण करीत असतान, यातील नमुद इसमांने शाळेच्या वर्गात जावुन,फिर्यादी यांना बाहेर चल मला तुझ्याशी बोलायचे आहे असे म्हणुन फिर्यादी ह्या त्याचे बरोबर जिन्यामध्ये आले असता, त्याने फिर्यादी यांना कोर्टात का आली नाही अशी विचारणा करुन, चिडुन जावुन, त्याच्या हातातील पिशवीतुन आणलेली प्लॅस्टीकची बाटली बाहेर काढुन, बाटलीतील पेट्रोल फिर्यादी यांचे अंगावर ओतुन माचीस मधील काडी पेटवुन फिर्यादी यांचे अंगावर टाकणेचा व त्यांना जाळुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जे.सी.गडकरी ९७६३८९०२२३ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १८०/१८,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | किशोर गजमल,वय-४४ वर्षे,रा. सिंहगड रोड, पुणे |
| **आरोपी** | अज्ञात वाहन चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/०९/२०१८ रोजी सकाळी ०६/३० वा.सुमारास सॅम पिझ्झा समोर मनपा चे वाहनतळ पार्किगचे समोर,शिरोळे रोड, पुणे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | अज्ञात इसमाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी इसम नामे-रोहीत रविंद्र कांगणे,वय २८ वर्षे,रा.एफ.सी. कॉलेज कॅम्पस,पुणे हा त्याचे मोटार सायकलवरुन वर्तमान पेपर वाटप करण्यासाठी जात असताना,त्याचे मोटार सायकला कोणीतरी अज्ञात वाहनाने धडक देवुन त्यास गंभीर जखमी करुन,त्याचे मुत्युस कारणीभुत होवुन तसेच अपघात ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.बी.भोसले ९८२३२९४८७८ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६९३/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२,११९/१७७ |
| **फिर्यादी** | आनंदसिंग डी. साबळे, पो.उप.निरी. येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात ट्रक चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०९/२०१८ रोजी पहाटे ०५/०० वा.चे सुमारास आंबेडकर चौक, येरवडा, पुणे येथे सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | अज्ञात इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी रस्ता क्रॉस करणारा इसम नामे- प्रकाश किसन मनोहर, वय ३१ वर्षे,रा.बंगाली पिंपळा,ता.गेवराई,जि.बीड यांस जबर ठोस मारून, गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.डी.साबळे, ८६९८३२१७१७. |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १०९८/१८,भादविक २७९,३०४(अ),३३८,मोव्हेॲक्ट १८४,१३४(अ),११९/१७७ |
| **फिर्यादी** | जयउद्दीन माणियार,वय ३७ वर्षे,रा. कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | टाटा मिक्सर वरील अज्ञात चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०९/१८ रोजी ११/३० वा.चे सुमारास शिवेंद्र हॉटेल समोर कात्रज, मंतरवाडी रोड, पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टाटा मिक्सर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी व त्यांचा मित्र नामे- अतिउल्ला हमीदउल्ला खान, वय ५२ वर्षे,रा.बिसमिल्ला पॅलेस साईबाबानगर जवळ, ३ रा मजला,रुम नं.१७,कोंढवा,पुणे असे मोटार सायकवरुन जात असताना, टाटा मिक्सर वरील चालकाने फिर्यादी यांचे मोटार सायकलला पाठिमागुन, जोरात धडक देवुन, फिर्यादी यांना खाली पाडुन जखमी करुन, फिर्यादी यांचे पाठीमागे बसलेल्या त्यांचा मित्र नामे- अतिउल्ला खान, याचे पाठीवरुन चालक जावुन, गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शेंडगे ९८२३९२३६१८ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ५९८/१८,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ३७ वर्षे,रा.कोंढवा खुर्द,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०९/२०१८ रोजी सकाळी १०/३० वा.चे सुमारास सर्व्हे नं.६०१ समता नगर, साईबाबा मंदिरामागे कोंढवा रोड, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांची मयत मुलगी नामे-राजश्री थॅामस, वय १९ वर्षे, हिला तिच्या मित्राने तिचेवर संशय घेवुन, तिला मानसिक त्रास देवुन, आत्महत्येस प्रवृत्त केल्याने फिर्यादीच्या मुलीने गळफास घेवुन आत्महत्या केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.ए.पवार ८८०५९८९४७२ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे १०९६/१८,भादविक ३९४,३४१,१७१,३४ |
| **फिर्यादी** | विजय शिंदे,वय २६ वर्षे,रा. कदमवाक वस्ती,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | इंडीका गाडीमधील चार अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०९/१८ रोजी सकाळी १०/३० वा.चे सुमारास जुना कॅनल रामदरा रोड,फुरसुंगी,ता. हवेली, जि.पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, इंडीका कारमधील अज्ञात इसमांनी त्यांची इंडीका कारने फिर्यादी यांच्या मोटार सायकलचा पाठलाग करुन,निर्मळवस्ती,येथे फिर्यादी यांची मोटार सायकल आडवुन, त्यास पोलीस असल्याची बतावणी करुन,इंडीका गाडीत बसवुन रामदरा रोड, नवीन कॅनल लोणी काळभोर येथे नेवुन, निर्जन ठिकाणी इंडीका गाडीतील चार अज्ञात इसमांनी काठीने,दगडाने,काचेच्या बाटलीने मारहाण करुन व चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीस दुखापत करुन, त्यांचेकडील १ लाख रुपये रोख रक्कम व मोबाईल जबरदस्तीने काढुन घेवुन गेले आहे. ( सदरचा गुन्हा लोणीकाळभोर पोलीस स्टेशन या ठिकाणी ० नंबरने दाखल करुन वर्ग केल्याने वरिष्ठांच्या आदेशान्वये वरीलप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. लोंढे ८९७५०२०५०० |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २८६/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | आशीष तांबे,वय ३१ वर्षे,रा.मांजरी रोड, पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०९/२०१८ रोजी रात्रौ ११/३० वा.चे सुमारास सोन्या मारूती चौकाचे थोडेसे पुढे सहजानंद ज्वेलर्स या दुकानाजवळ,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, फिर्यादी हे त्यांचे मित्रांसह गणपती विसर्जन मिरवणुक पाहत असताना,सोन्या मारूती चौकाचे थोडेसे पुढे आल्यावर तेथील सहजानंद ज्वेलर्स या दुकानाजवळ अचानक त्यांचे पाठीमागुन गर्दीतील अनोळखी इसमांनी येवुन,फिर्यादी यांना धक्काबुक्की करून, गर्दी जमवुन त्यांचे अंगावर येवुन, त्यातील एका इसमाने त्यांचे गळयातील सोन्याची चैन ४० हजार रुपये किंमतीची जबरदस्तीने ओढुन घेवुन तेथुन निघुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. शिंदे ८३०८३२५१९५ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ४५२/१८,भादविक ४१९,४२० |
| **फिर्यादी** | आशा कुचेकर,वय २५ वर्षे,रा.पांडवनगर,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०९/२०१८ रोजी सकाळी ११/०० वा.चे सुमारास कुसाळकर पुतळा चौकात लजपतराय होस्टेल समोर, जनवाडी, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद ता. वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी यांचे घरी पितळी भांडयाना/दिव्यांना पॉलीश करुन देण्याच्या बहाण्याने आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीचा व त्यांचे आईचा विश्वास संपादन करुन,त्यांचे सोन्याचे दागीने पॉलिश करुन देण्याचा बहाणा करुन,एका डब्यात हळद व पाणी मिसळुन त्यांचेकडील लाल रंगाची पावडर मिसळुन दोघींचे दागीने त्या डब्यात ठेवायला सांगुन तो डबा गॅसवर ठेवताना हातचलाखीने करुन, त्यातील ७१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने १ लाख ७७ हजार ५००/- रुपये किंमतीचे काढुन घेवुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.उप.निरी. डी. एस. शिंदे ७२७६१००१०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**